मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

अंक ६७ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● सप्टेंबर २००६

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## मराठे प्रतिष्ठान दैनंदिनी २००७

### १०० रुपयात आपले नाव छापलेली डायरी मिळवा

प्रतिष्ठान डायरीचे हे दुसरे वर्ष. मागील वर्षाप्रमाणेच प्रत्येक दिवसाला पूर्ण पान अधिक ३५ पाने विविध प्रकारची उपयुक्त माहिती अशी एकूण ४०० पाने असतील. ही माहिती खूपच उपयुक्त असल्याच्या अनेक प्रतिक्रिया गेल्या वर्षी आल्या. प्रती हातोहात संपल्याने अनेकांना निराश व्हावे लागले.

**आपणांस ही डायरी नक्की मिळावी यासाठी आपण फक्त एवढेच करा -**

आपला स्वत:चा, मुलांचा, बायकोचा, आईवडील, भाऊ-बहीण अथवा अन्य नातेवाईक यांच्या वाढदिवसांप्रीत्यर्थ अथवा स्मृतिप्रीत्यर्थ विवक्षित तारखेचे पृष्ठदान करा आणि त्या बदल्यात आपण एक डायरी मिळवा - अगदी घरपोच आणि कटाक्षाने वर्ष सुरू होण्यापूर्वी. **पृष्ठदान शुल्क आहे केवळ रु. १००**. आपण कळविलेल्या तारखेच्या पानाच्या तळाशी आपले अथवा आपणास हव्या त्या व्यक्तीचे नांव, गाव, फोन. नोकरी/व्यवसाय व पद छापले जाईल.

पृष्ठदानाप्रमाणेच काही जाहिरातीहि घेतल्या जातील. त्यासाठीचे दर पृष्ठदान रु. १०० शुभेच्छा पट्टी रु. ३००, कृष्णधवल पाव पान रु. ५००, अर्धे पान रु. १५००, पूर्ण पान रु. ३०००, रंगीत पूर्ण पान रु. ३५००, मलपृष्ठ व मुखपृष्ठाचे आतील पान रु. ५०००, मलपृष्ठ रु. ७०००.

त्वरित (सप्टेंबर अखेरपर्यंतच) जाहिरात द्या वा पृष्ठदान करा आणि आपणास ही डायरी मिळण्याची हमी मिळवा. संपर्क : सौ. नीलांबरी मराठे, आप्पा बळवंत चौक, फोन - २४४५६२७०, श्री. अरुण दत्तात्रय मराठे, भिकारदास मारुती जवळ, फोन - २४४७३२८१, श्री. श्रीनिवास गोपाळ, CDSS जवळ, एरंडवणे, फोन - २५४६४७०६. (अधिक माहितीसाठी पहा हितगुज जून २००६).

* * *

## चतुर्थी

*गणेशचतुर्थी सारेजण जाणतात. पण अशी किती चतुर्थीव्रते आहेत त्यांची कुतूहल म्हणून संकलित केलेली माहिती.*

शुक्ल व कृष्ण या दोन्ही पक्षातली चौथी तिथी. हिला चंद्राच्या चतुर्थ कलेची क्रिया असे म्हणतात. चतुर्थीच्या दिवशी मंगळवार असल्यास त्या दिवशी केलेले दान-पुण्य अक्षय्य होते. असे भविष्यपुराणात सांगितले आहे.

गणेशचतुर्थी, गौरी चतुर्थी, नाग चतुर्थी, कुंड चतुर्थी, बहुला चतुर्थी, संकष्ट चतुर्थी, विनायकी चतुर्थी अशी सुमारे २५ चतुर्थी व्रते सांगितली आहेत. भविष्य पुराणात शिवा, शांता व सुखा अशा तीन चतुर्थी सांगितल्या आहेत. त्या अनुक्रमे भाद्रपद चतुर्थी, माघ चतुर्थी आणि अंगारकी चतुर्थी या होत. उत्तर भारतातल्या स्त्रिया कार्तिक चतुर्थी (करवाँ चौथ), माघ चतुर्थी (तिलकुट्टी चौथ) वैशाख व भाद्रपद मासाच्या चतुर्थी पुण्यप्रद मानून त्या दिवशी व्रत करतात व त्या त्या व्रताची कहाणी ऐकतात.

व्रत व उपवास यांच्यासाठी चतुर्थी घ्यायची ती तृतीयायुक्त घ्यावी असे ब्रम्हवैवर्त पुराणात सांगितले आहे. हेमाद्रीने चतुर्थीच्या प्रदोषकाली अनाध्याय करावा असे सांगितले आहे. त्यानेच चतुर्थीचे रूपविधान सांगितले आहे. ते असे -

नीलोत् पलाभासा चतुर्थी मूषकस्थिता।<br>
परशुं बिभ्रती पात्रं पीतवस्त्रादिसंयुता।।

चतुर्थी ही नीलकमलाच्या पत्रासारख्या कांतीची, मूषकवाहना, परशू व पात्र धारण करणारी व पीतवस्त्र, पीतपुष्प इ. पिवळ्या वस्तूंनी युक्त अशी करावी. (आधार : भारतीय संस्कृति कोश, खंड ३, पृ.३२७)

(संकलक: **सौ. उर्मिला लक्ष्मण**, पृ.५२०, मुलुंड)

* * *

**मराठे प्रतिष्ठान**

पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)

मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : २४३०२४५३.

वेबसाईट : www.marathepratishthan.org

# प्रतिष्ठान वृत्त

**कार्यकारी मंडळ**

प्रत्येक महिन्याच्या **दुसऱ्या शनिवारी सायंकाळी ४ वाजता** कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीहि सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो.

मागील तिमाहीत **१० जून, २२ जुलै व १२ ऑगस्टच्या शनिवारी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या.** १० जूनची सभा प्रतिष्ठान कार्यालयात झाली. कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस परदेशातून येणार होते म्हणून जुलै मध्ये चौथ्या शनिवारी त्यांच्या माहीम येथील निवासस्थानी सभा झाली. १२ ऑगस्टची सभा सुलभाताई मराठे यांच्या निमंत्रणावरून त्यांच्या घरी घेण्यात आली.

संपादक श्री. लक्ष्मण शंकर यांनी जून २००६ च्या हितगुजमध्ये, ५० अंकांची नॉन-स्टॉप वाटचाल - यापुढे काय? असा खडा सवाल कुलबांधवांना केला होता आणि हितगुजची जबाबदारी नव्या पिढीने घ्यावी असे आवाहन केले होते. २२ जुलैच्या सभेत त्याविषयी चर्चा झाली. कार्यकारिणीची सदस्य डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर यांनी 'हितगुज'साठी संपादन करण्याची तयारी दाखविली परंतु कार्यकारी संपादिका म्हणून सुरवातीला काम करून संपादकाच्या मार्गदर्शनाचा अनुभव घेतल्यानंतरच संपादकपदाची धुरा सांभाळण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. पुण्याहूनही संपादन कार्य स्वीकारण्याची अरुणा मराठे यांची तयारी असल्याचे पुणे प्रतिनिधी श्रीनिवास मराठे यांनी सांगितले. कार्यकारी मंडळाने लक्ष्मणरावांनी अजून वर्षभर तरी संपादकपदी राहावे व या काळात सौ. सुमेधा मराठे यांचे सहाय्य घ्यावे असा आग्रह धरला. लक्ष्मणरावांनी ते मान्य केले. (या अंकात त्यांचा सहभाग आहे - संपादक)

याच सभेत, प्रसिद्ध **लघुउद्योजक मधुसूदन खांबेटे तथा अप्पा** (पृ.६९५) यांचा **आणि त्यांच्या सुविद्य पत्नी पद्मजाताई यांचा ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सत्कार** करण्यात आला. कार्यकारिणीचे ज्येष्ठ सदस्य श्री. वि. के. (पृ.२०) यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन अप्पांविषयी गौरवोद्गार काढले. सौ. पद्मजाताईंना प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई सुरेश यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देण्यात आला. उपाध्यक्षांच्या पत्नी सौ. शुभाताईंनी त्यांना सुंदरशी साडी चोळी देऊन त्यांची ओटी भरली. मराठे प्रतिष्ठानने केलेल्या ह्या घरगुती सत्कारामुळे दोघे पती-पत्नी भारावून गेले.

सौ. पद्मजाताईंनी आणि अप्पांनी सत्काराला उत्तर देणारे छोटेखानी भाषण केले. **पद्मजाताईंनी अप्पांची पत्नी म्हणून भूमिका जगताना आलेले अनुभव सांगितले.** सुरवातीला कलकत्त्याला ते राहात होते. मग धंदा करण्याच्या निमित्ताने ठाण्यास आले तेव्हा भागीदारांकडून फसविले गेले. पार्टनरने त्यांच्या विश्वासघात केला. तरीही न डगमगता धैर्याने आल्या प्रसंगाला तोंड दिले. भागीदारीत व्यवसाय न करता स्वतंत्रपणे स्वत:च्या पायावर उभे राहून व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. रेल्वेतल्या सिग्नल यंत्रणेसाठी अत्यावश्यक असलेल्या सुट्या भागांची निर्मिती करण्याचा कारखाना काढला आणि जिद्दीने तो यशस्वी केला.

साहस, कष्ट करण्याची तयारी या अप्पांच्या गुणांचे त्यांनी कौतुक केले. लग्न झाले तेव्हा त्यांनी रुखवतावर पत्त्यांचा कॅट ठेवला होता. अप्पांना ब्रिज खेळण्याचे फार वेड होते म्हणून. त्या काळातही त्यांच्याकडे चारचाकी वाहन होते. त्याचे सर्वांना अप्रूप वाटत असे. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी ते विकले नाही. अप्पा जमदग्निचे अवतार, संतापी होते. याचे अनेक किस्से रंगवून सांगितले. मात्र बाहेर रागावून आले की राग काढायला बायकोशिवाय दुसरे हक्काचे माणूस कोण मिळणार या दृष्टीने मी याकडे पहात असे असेहि त्यांनी सांगितले. खऱ्या अर्थाने पद्मजाताई सहधर्मचारिणी होत्या हे त्यावरून लक्षात आले. शिवाय त्यांनी स्वत:ही वनौषधींची दुर्मिळ माहिती जमवून पुस्तक लिहिले.

आप्पांनीही, आजवर अनेक ठिकाणी मोठ-मोठे सत्कार झाले पण आजच्या या घरातल्या सत्काराचे मोल काही वेगळेच आहे. अशा भावना व्यक्त करून मराठे प्रतिष्ठानला सर्वतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी पद्मजाताईंनी दोन पुस्तके (मधुर अमृतकुंभ) भेट म्हणून दिली आणि द्रव्य देणगी म्हणून रु. २००० दिले. चहा, अल्पोपहार होऊन सभा संपली.

दि. १२ ऑगस्ट २००६ ला माहीम येथे मराठे प्रतिष्ठानच्या विश्वस्त श्रीमती सुलभाताई सुरेश यांच्या निवासस्थानी सभा झाली. सुलभाताईंनी प्रसन्नपणे सर्वांचे स्वागत केले. या सभेला महिलावर्गाची उपस्थिती लक्षणीय होती. या सभेत **वास्तुप्रकल्पनिधीविषयी चर्चा** झाली. श्री. मोहनराव यांनी १०,००० रु. वास्तुप्रकल्पनिधीला दिले. अध्यक्षांनी वास्तुप्रकल्पाला परदेशस्थ मराठ्यांचे सहाय्य मिळवण्यासाठी त्यांना पाठवायच्या स्मरणपत्राचा मसुदा वाचून दाखवला तो सर्वांनी मान्य केला. या आधी सुमारे ६ महिन्यांपूर्वी असे आवाहनपत्र गेले होते असे हेमंत महादेव यांनी निदर्शनास आणून दिले. मात्र त्याला प्रतिसाद मिळाला नव्हता याची नोंद घेण्यात आली.

कुलबांधवाची आत्मीयता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. याविषयी वा.ग. नी नाराजी दर्शविली.

**सुरेशभाऊंचे चिरंजीव श्री. यशवंत यांनी रु. दहा हजार देणगी म्हणून प्रतिष्ठानला दिले** व पुढेहि दरवर्षी अशीच रक्कम देणार असे सांगितले. याला कुठलाहि टॅग लावू नये, कोणाच्याही स्मृतीच्या नावाचा उल्लेख करू नये असेहि त्यांनी सांगितले. प्रतिष्ठानने शैक्षणिक कार्यासाठी, वैद्यकीय सहाय्यासाठी वा अन्य कारणासाठी वापरावे, केवळ बँकेत फिक्स डिपॉझिटमध्ये अडकवून ठेवू नयेत असेहि त्यांनी सांगितले.

कार्यकारिणीची पुढील सभा अध्यक्ष आनंदराव यांच्या घरी, ठाणे येथे १ सप्टेंबरला घेण्याचे ठरवून सभेचा समारोप झाला.

**वर्गणी व देणग्या**

जून ते ऑगस्ट २००६ या तिमाहीत प्रतिष्ठानकडे जमा झालेल्या सभासद वर्गणी, हितगुज वर्गणी, जाहिराती आणि देणग्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

**अ. आजीव सभासदत्व/हितगुज वर्गणी** :

१. संजय रामचंद्र, अमरावती रु. ३००

*(पुढे पृ.१५ वर)*

# सभासद वृत्त

## मानसन्मान

### एक अपूर्व विद्यार्थिनी - अपूर्वा अजित

ठाणे येथील सभासद **अजित वामन (पृ.२७७) यांची मुलगी अपूर्वा** (आता अपूर्वा जोशी) ही एक आगळीवेगळी, अगदी अपूर्व विद्यार्थिनी आहे. B.A. ला भूगोल हा फारसा कुणाला नको असलेला विषय घेऊन आता नुकतीच ती 'नासा' मध्ये असिस्टंट रिसर्च सायंटिस्ट म्हणून रूजू झाली आहे.

अभ्यास, क्रीडा, कला, संगीत सर्वात उत्तम गती. इ. २री पासूनच गळा सुरेल असल्याची जाणीव. तेव्हापासून आजपर्यंत सध्या अमेरिकेत सुद्धा 'पंडीत जसराज अॅकेडमी' मध्ये तिचा रियाज नियमित चालू आहे.

गाणं गाता गाता अपूर्वाने महाराष्ट्रात 'सर्वोत्कृष्ट अॅथलेट' म्हणूनहि गौरव प्राप्त केला. अकरावीत 'इंडो जपान सोसायटी'तर्फे होणाऱ्या चित्रकला स्पर्धेत भारतातून निवडल्या गेलेल्या अकरा कलावंतापैकी ही एक.

परंतु हे सर्व करताना तिला ध्यास होता भूगोलाचा. काहीतरी वेगळे करावयाचे स्वप्न उराशी बाळगले व भूगोल हा विषय घेऊन ती B.A. ला मुंबई विद्यापीठात पहिली आली. नंतर M.A. करून Phd साठी अमेरिकेत गेली. University of Georgia मध्ये तिला शिष्यवृत्ती मिळाली. तिथे तिने Geographical Information System व Cartography (map making) हे दोन विषय निवडले.

या विषयातील आमचे ज्ञान तुटपुंजे; परंतु हा विषय किती महत्त्वाचा आहे हे पुढील एका प्रसंगामुळे कळले. M.A. झाल्यावर तिला Indian Army कडून जॉईन होण्यासंबंधात विचारणा झाली.

मराठ्यांचा बाणेदारपणाचा आणखी एक प्रसंग. Phd च्या दुसऱ्या सत्रात तिला विद्यापीठाने या विषयाकरता पुरेसा निधी उपलब्ध नसल्याचे सांगितले. यावर तिने प्रोफेसरांना सांगितले, 'सर, नुकसान तुमच्याच विद्यापीठाचे आहे. माझ्यासारख्या हुशार मुलीला इतर विद्यापीठात लगेच शिष्यवृत्ती मिळेल.' लगेचच त्यांच्या HOD ची एक बैठक बोलावली गेली व तिची शिष्यवृत्ती मान्य झाली.

अभ्यासू वृत्ती, जिज्ञासा, नवीन शिकण्याचा हव्यास हा अपूर्वाचा स्थायीभाव. इजिप्तमध्ये पुढील संशोधनाकरता ती जाणार होती. पण तेवढ्यात तिला NASA मध्ये 'Asst. Research Scienceiest' म्हणून प्रवेश मिळाल्याचे आजच हे लिहिता लिहिता फोनवर कळले. (प्रेषक - सौ. अनिता अजित, पृ.२७७, ठाणे)

### सिद्धार्थ मराठे B.S. (मिचिगन युनिव्हर्सिटी)

पुणे येथील सदस्य **श्री. सुरेश रामकृष्ण (पृ.९०) यांचा मुलगा चि. सिद्धार्थ** याने नुकतीच (April 2006) अमेरिकेतील Michigan Technological University मधून B.S. (Electrical Engg.) ही पदवी उच्च श्रेणीत संपादन केली व आता तो Texas येथील BLACK & VEATCH ह्या Multinational कंपनीत नोकरी करीत आहे. सिद्धार्थच्या ह्या यशाबद्दल त्याचे मराठे परिवारातर्फे अभिनंदन व भावी काळात असेच उज्ज्वल यश मिळो अशा शुभेच्छा. (प्रेषक - सौ. नीलांबरी रमेश, पुणे)

### प्रीता संजय करमरकर - १०वीत मुंबई बोर्डात १०वी

मराठ्यांची नात, **लक्ष्मण शंकर (पृ.५२०) यांच्या मुलीची मुलगी प्रीता संजय करमरकर** ही मार्च २००६ मध्ये झालेल्या एस.एस.सी. परीक्षेत गुणवत्ता यादीत मुंबई विभागात १०वी आली. तिने ७५० पैकी ७०४ (९३.८६%) गुण मिळवले. विशेष म्हणजे कोणत्याहि कोचिंग क्लासला न जाता सातत्याने, नियमित स्वत:चा स्वत: अभ्यास करून तिने हे यश मिळवले. त्याबरोबरच तिने खेळाकडेहि दुर्लक्ष केले नाही. जिल्हा पातळीवरच्या कबड्डी स्पर्धेत कात्रप विद्यालय, बदलापूर या तिच्या शाळेच्या कबड्डी संघाची ती कप्तान होती. त्यांच्या संघाला उपविजेतेपद मिळाले होते. तिला भावी शैक्षणिक यशासाठी मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

### श्रद्धा रामचंद्र - उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत

मुलुंड, मुंबई येथील **सभासद रामचंद्र गोविंद (पृ.५३५) यांची मुलगी श्रद्धा** वर्षभरापूर्वी सर जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मधून B.Arch परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. २ वर्षांचा मास्टर्स ऑफ बिल्डींग सायन्स हा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सदर्न कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीची स्कॉलरशिप मिळवून ती जुलै अखेर अमेरिकेत रवाना झाली. तिला शैक्षणिक यशासाठी मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

**चुकीची दुरुस्ती : 'अनिल' नव्हे, अदिती श्रीपाद**

जून ०६ च्या अंकांत १२वीतल्या (२००४-०५) गुणवत्ता पारितोषिकांची माहिती छापली आहे. त्यामध्ये क्र. ७ अनिल श्रीपाद (पृ.८७), डोंबिवली असे नांव छापले आहे ते 'अदिती श्रीपाद' असे वाचावे.

### अभिनंदनीय निवड

तिस्क, उसगांव, गोवा येथील सभासद, सेवानिवृत्त शिक्षक **गोविंद नारायण यांचा मुलगा अमित** (पृ.५४१) याची दिल्ली येथील आय.आय.टी. च्या एम.डी. (मेकॅनिकल डिझाइन) या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी २५ उमेदवारांतून ६व्या क्रमांकाने निवड झाली. या शिक्षणाच्या अंतिम परीक्षेतही चि. अमितला उज्ज्वल यश मिळो अशी प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.

## मराठ्यांचे मंगल कार्यालय

आपले सभासद माधव यशवंत (पृ.५११) यांचे बंधु सुरेश यांचे मठ, ता. वेंगुर्ले येथील घरी दि. ९ ऑगस्ट २००६ रोजी मराठे बंधूंच्या श्रीस्वयंभू मंगल कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. मराठे बंधूंना या नव्या उपक्रमाबद्दल मराठे परिवारातर्फे शुभेच्छा.

## सहवेदना

१. मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत, जि. रायगड येथील **सभासद सदानंद प्रभाकर विद्वांस** (पृ.६५८) यांचे अल्पशा आजाराने २५.३.२००६ रोजी ६०व्या वर्षी निधन झाले. ते कल्याण येथील छापखान्यात नोकरीला होते. हितगुजमध्येहि ते लिहीत असत. हितगुजच्या डिसेंबर २००५ मध्ये त्यांचा मुलगा सुनील याचा लेख 'अहो मला लग्न करायचंय' प्रसिद्ध झाला होता.

२. बेळगांव येथील **सभासद श्रीरंग दिवाकर** (पृ.४७१) यांचे अल्पशा आजाराने २२.७.२००६ रोजी दु:खद निधन झाले. ते ५० वर्षांचे होते.

३. आपले मिरज येथील **सदस्य सुहास बळवंत (पृ.८३) यांचे वडील बळवंत दत्तात्रेय** (दादासाहेब) यांना १४.७.२००६ रोजी देवाज्ञा झाली. ते ७९ वर्षांचे होते. त्यांनी मराठे मिलमध्ये पर्यवेक्षक म्हणून दीर्घकाळ नोकरी केली. निवृत्तीनंतर त्यांनी आपले आजोबा बळवंत भास्कर, विष्णुदास भावे यांच्या सांगलीकर नाटक मंडळीतील कलावंत यांची नाट्यक्षेत्रातील दुर्लक्षित राहिलेली मोलाची कामगिरी प्रसिद्धीत आणली. आपल्या ''नूतन सांगलीकर मंडळी'' या नाटक कंपनीमधून मराठीत पहिल्यांदा लिखित स्वरूपातील संहितापूर्ण नाटके सादर केली. (प्रेषक : विठ्ठल महादेव, सांगली)

४. प्रतिष्ठानचे सांगली येथील **सभासद प्रभाकर सदाशिव (पृ.८६४)** यांचे २०.६.२००६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. सांगली केंद्रातील प्रतिष्ठानच्या कामात त्यांचा चांगला सहभाग असे. (प्रेषक : विठ्ठल महादेव, सांगली)

५. पुण्यातील **सदस्य संजय रघुनाथ यांचे पिताजी रघुनाथ कृष्णाजी** (पृ.४२७) दि. २४ मे २००६ रोजी दमण येथे घरी हृदयविकाराने अकस्मिक निधन झाले. त्यांचे वय ७६ वर्षांचे होते.

त्यांनी किर्लोस्कर व किर्लोस्करवाडी येथे ४० वर्षे उत्तम प्रकारे नोकरी केली. तेथील सामाजिक कामात त्यांचा चांगला सहभाग असे. रामानंदनगर येथील ब्राह्मण सेवेचे ते सक्रीय कार्यकर्ते होते. त्यांनी आपला प्रपंच नेटका केला व समर्थउक्तीप्रमाणे ते आता परमार्थाकडे वळले होते. दासबोध वाचन व ज्ञानेश्वरी वाचन नियमाने चालू होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. (प्रेषक - संजय मराठे) ***

# गोत्रे चतुर्दश कुळे मुळ साठि होती

- **कालिदास बाळकृष्ण** (पृ.५४१), गोवा

ताम्हनकर मंडळ, मुंबई यांच्या गुढीपाडव्याच्या शुभेच्छापत्रात प्रसिद्ध झालेले एक १८ श्लोकी काव्य का. बा. यांनी पाठविले आहे. यामध्ये १४ गोत्रांजली, २०० आडनांवे गुंफलेली आहेत. यांतला अखेरचा श्लोक आणि ६वा श्लोक (कपिगोत्राबाबतचा) वानगीदाखल येथे छापला आहे.

गोत्रे चतुर्दश कुळे मुळ साठि होती<br>
त्यांचेचि संततिमुळे बहू भेद होती<br>
नेत्रां अधीक सकळही शत दोन साद्ये (झाले?)<br>
यांते अधिक असती तरि भेद यांचे ।।१८।।

काळे, विद्वांस, कर्दीकर, त्रिमये (लिमये?)<br>
आणि जे कां मराठे<br>
खांबेटे मांईदेवां सहित परिशिजे<br>
आणि सान्ये रटाटे<br>
बांठे, जाईल जे का तदुपरि परिसा<br>
भागवत्ताभिधाने<br>
संख्या जाणा दलालां सह रविसमये<br>
युक्त गोत्रा कपीने ।।६।।

वरील ६व्या श्लोकात (कपिगोत्रांत) चक्रदेव, जोशी आणि फडणीस यांचा उल्लेख नाही. जोशींचा वत्स, काश्यप आणि शांडिल्य गोत्रांत उल्लेख आहे. पण चक्रदेव आणि फडणीस यांचा २००च्या यादीतच उल्लेख नाही.

विद्वांसांचा कपिगोत्राप्रमाणेच शांडिल्य गोत्रांतहि 'जोशी सोमण दामले परचुरे आणीक विद्वांस हि' असा उल्लेख आहे.

वरील बाबतीत कोणी कुलबांधव विशेषत: चक्रदेव, जोशी, फडणीस आणि विद्वांस अधिक प्रकाश पाडू शकेल काय? - संपादक ***

## कै. चिंतामण बळवंत मराठे हस्ताक्षर स्पर्धा २००७

१. स्पर्धेसाठी वयाची अट नाही. मात्र स्पर्धा तीन गटात विभागली आहे. (अ) गट क्रमांक १ - ३० वर्षांच्या आतील स्त्री व पुरुष. (ब) गट क्रमांक २ - वय वर्षे ३१ ते ५९ या गटातील स्त्री व पुरुष आणि (क) गट क्रमांक ३ - वय वर्षे ६० व पुढील स्त्री व पुरुष (ज्येष्ठ नागरिक).

२. प्रत्येक गटात रु. २००, १५०, १०० अशी तीन व रु. ५० चे एक उत्तेजनार्थ अशी बक्षीसे दिली जातील.

३. मराठ्यांच्या माहेरवाशिणीहि स्पर्धेत भाग घेऊ शकतात.

४. स्पर्धकांनी मराठी, हिंदी, इंग्रजी १० ओळी हस्ताक्षर फक्त काळ्या शाईने लिहिलेले पाठवायचे आहे. इतर शाईमध्ये लिहिलेले हस्ताक्षर स्पर्धेकरता विचारात घेतले जाणार नाही.

५. हस्ताक्षर पाठवताना आपला संपूर्ण पत्ता टेलिफोन क्रमांक व जन्मतारखेचा उल्लेख करावा तसेच गट क्रमांकही लिहावा.

६. स्पर्धकानी आपले **हस्ताक्षर** खालील पत्त्यावर **३१.१२.२००६ पूर्वी पाठवावे**. उशीरा आलेल्या हस्ताक्षराचा स्पर्धेकरता विचार केला जाणार नाही.

७. स्पर्धेचा निकाल २८.१.२००७ रोजी जाहीर करण्यात येईल. मार्च २००७ च्या हितगुजमध्येहि प्रसिद्ध करण्यात येईल.

८. स्पर्धकांना त्यांची बक्षीसे फेब्रुवारी २००७ मध्ये पाठविली जातील.

**- श्री. गजानन चिं. मराठे**, प्लॉट नं. ३४ अ, सार्थक, सेनादत्त कॉलनी, पुणे ४११०३०. फोन २४३३१६५१, २५३३१६५१ ***


**आजी लक्ष्मी हरि मराठे**

**यांच्या स्मरणार्थ**



**प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा, मुंबई - ४०० ०३१.

# एक हिमालयन ट्रेक - अधूरा

- आनंद यशवंत (पृ.२७७), ठाणे

*प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंदराव मधून मधून सपत्निक 'ट्रेक'ला जात असतात - पायी हं, जीपमधून नव्हे! असे सात-आठ हिमालयातले ट्रेक त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केले आहेत - अगदी २१ दिवसांच्या १६५०० फूट उंचीवरील ओम पर्वत, लिपू पास 'ट्रेक'सह. पण त्याहून कमी उंचीवरील 'चंद्रताल'चा ट्रेक मात्र एक दिवसाचा प्रवास शिल्लक असताना थांबवावा लागला, हा दैवदुर्विलासच नव्हे काय?*

*वयाच्या ६०व्या वर्षी केलेल्या चित्तथरारक 'ट्रेक'ची ही हकिगत. - संपादक.*

**१ सप्टेंबर, रविवार** - सकाळी ७ वाजता ठरल्याप्रमाणे गोकूळ - आपल्या काफल्यासह हजर झाला. भाड्याने घ्यायचे सामान कालच घेतले होते. स्टीलची ताट, वाट्या, पातेली, बरशेन वगैरे (Mini kitchen) मनालीच्या बाहेर ४ कि.मी. वर असलेल्या प्रीनी गावात ९ वाजता पोचलो. सामान घोड्यावर adjust करून ९.३० वाजता चालायला सुरवात केली. १२ वाजता हमता गावाला पोचेपर्यंत फक्त चढ आणि चढच! दम निघतो या ट्रेकला!! घोडे असले तरी ते फक्त सामानासाठी होते - गोकूळ बरोबर मामू घोडेवाला - छोटू गडी - पुरणमल (आमचा बल्लवाचार्य) व चार घोडे. हमताला पुरणने सांगितले की आता रस्ता फक्त एक तासाचा आहे व सर्व प्लेन आहे. पण हा आनंद १५ मिनिटांत मावळला. पुढचे शेतन Shetan गाव यायला दोन वाजले.

हमताला सॅकममधील सँडविच खाल्ले व परत चालायला सुरवात केली. असंख्य दगड-गोट्यांनी भरलेल्या रस्त्याने चढ उतार करीत ३।। वाजता एका ओढ्याच्या ठिकाणी मुक्काम केला. गोकूळने १० मिनिटात तंबू लावले. १ आमचा - १ त्यांचा व पूरणचा - १ kitchen tent - १ मामू व छोटूचा. आल्या आल्या चहानी स्वागत झाले पण लगेचच आमच्या पुरणजींनी आम्हाला मटार सोलावयास बसवले. आम्ही वस्ती केलेल्या जागेला पांडू रोपा म्हणतात. तेथे म्हणे पांडवांनी शेती केली होती. आम्ही पोचलो तेव्हा उन्हाचे चटके बसत होते. तर tent मध्ये विलक्षण उकडत होते. पण सुमारे तासाभरात निसर्ग बदलला. संपूर्ण दरी धुक्याने भरली व हवेत विलक्षण गारठा आला.

**२ सप्टेंबर, सोमवार** - सकाळी ५.३० ला tent च्या बाहेर आलो. रात्री तशी झोप लागली नाही. माझ्याकडे संजितची Sleeping Bag तर सौ. नंदिनीकडे चि. मंदारची. काल संध्याकाळी ६ वाजता सूप व ६.३० वाजता जेवण. त्यांच्या भाषेत Dinner - डिनरला पुलाव - ब्रेड - आलू मटार - नंतर sweets - पाकातला पाव व शेवटी कॉफी. थोडा वेळ गप्पा मारून ७.३० ला tent मध्ये मुक्काम. ६.३० वाजता कानटोपी व लगेचच Wollen stockings घालण्याएवढी हवा थंड झाली. Tent मध्ये कारण नसताना उगाचच अनामिक भीति वाटत होती. खरं तर त्याला काही अर्थ नाही. कारण गोकूळ मंदारचा (आनंदरावांचा मुलगा) मित्र आहे व त्यांनी मंदारबरोबर असंख्य ट्रेक केलेत. झोप न येण्यास दुसरे कारण रात्री १२ वाजेपर्यंत बाहेर गद्दीची वर्दळ चालू होती. (गद्दी - धनगर) हे गद्दी रात्री शेळ्या-मेंढ्या घेऊन दुसऱ्या गावाला जातात.

सकाळी ७.३० ला पुढे दोन तास घनदाट जंगलातून व त्यातल्या त्यात बऱ्यापैकी पण दलदलीच्या रस्त्याने कूच केले. नंतरचा मार्ग म्हणजे दिव्य होते. २ डोंगर उतरलो व चढलो. सुमारे ११.३० च्या सुमारास एक झरणा लागला. झरा कसला, धडकी भरेल इतका जोरदार प्रवाह खाली होता. तो पार करावयाचा पूल आठ दिवसांपूर्वी म्हणे तुटला होता. आता त्यावर एक लांब व जाड झाड टाकून पूल तयार केला होता. आम्ही दोघेही घाबरलो. खाली प्रवाह भीतीदायक होता. शेवटी गोकूळ व पूरणच्या मदतीने झरणा पार केला. नंतरचा प्रवास नाल्याच्या वाळवंटातून होता. असंख्य व मोठ मोठे दगड. त्यातून वाट काढत चालल्यावर सुमारे तासाभराने डोंगर चालू झाले. आता चालताना परत पाऊल twist व्हायची भीती होती. अनेक ठिकाणी पाऊलवाट अतिशय अरुंद आहे. कसरत करावी लागते. आज नाल्याची साथ शेवटपर्यंत आहे. पण नाल्याचा प्रचंड जोरदार प्रवाह आहे व आत मोठाले गोटे.

पुढे परत ३ झरणे दोघांच्या मदतीने पार करावयास लागले. ३.३० वाजत आले आणि अजून आमच्या camp site चा पत्ता नव्हता. शेवटी लांबवर मामू व पूरण बसलेले दिसले. पण tent चा पत्ता नव्हता. पण ते दोघे आमच्यासाठी थांबले कारण शेवटचा पार करावयाचा झरणा जीवघेणा होता. परत सर्वांची मदत घेत जीव मुठीत धरून झरणा पार केला. नंतर पुढे परत सुमारे १५ मिनिटे दगडातून चालल्यावर tent दिसला व हुश केले. समोरच्या cozzy mat वर बसकण मारली. पाचच मिनिटात भजी झाली. नंतर चहा, दुपारी २ वाजता पावसाला सुरवात झाली होती. आता त्याचा जोर वाढला. Tent मध्ये गुपचुप बसून राहिलो. संध्याकाळी ६ वाजता सूप आले व ६.४५ Dinner over. ७.१५ ला tent बंद करून चिडीचिप.

## घर

- डॉ. सौ. शशिकला चिंतामणी (पृ.४१), पुणे

असो सदनिका किंवा बंगला
चार भिंतीचा खेळ हा सगळा।।
त्या भिंतीच्या आतही भिंती
वेगवेगळ्या खोल्या बनती।।
कीचन, बेडरूम, हॉल, गॅलरी
चौरस फुटांची चढती पायरी।।
या रचनेला तर विरोध नाही
गरज काही अन् हौसही काही।।
परी वाटतो, बहराव्या भिंतीवर
गर्द मायेच्या वेळी
ही वेडी आशा फोलच ठरते
बहुधा बऱ्याच वेळी।।
'मी'पणा जपते प्रत्येकाची खोली
मूक बनते परस्परांतील बोली।।
भिंतीचे मग बनती अडसर
हरवून जाते घराचे घरपण।।

**३ सप्टेंबर, मंगळवार** - काल रात्री कधीतरी पाऊस थांबला असणार. कारण सकाळी ५.५० ला सगळीकडे स्वच्छ होते. चहा घेऊन 'ज्वारा' (काल मुक्काम केला त्या जागेचे नांव) ७ च्या सुमारास सोडले व चालावयास सुरवात केली. आज अंतर तसे जास्त नव्हते पण उंची (altitude) १४५०० फूट होती. सुमारे तासभर हलकासा चढ चढत रमत गमत रस्ता पार केला. दोन्ही बाजूला डोंगर व मध्ये जोरदार वाहणारा झरणा. थोड्या वेळातच दूरवर 'इंद्रगड' शिखर दिसायला लागले. नांव अगांदि योग्य होते. शिखर (Peak) एखाद्या किल्ल्यासारखे दिसत होते व सर्व बाजूला तट. बंदीही केलेली दिसत होती. शिंखराची उंची फक्त २०,००० फूट आहे पण अजून कोणीहि ते सर केलेले नाही.

बांधून आणलेला नाश्ता संपवला व पुढचा भीषण खडतर - संपूर्ण दगडांनी भरलेला रस्ता सुरू झाला. ११च्या सुमारास 'हमता' Base ला येऊन पोचलो. मंदारचे ऐकले नाही म्हणून स्वत:ची संभावना केली. कारण त्याने आम्हाला आमचा चंद्रतालचा treck जीपने करावयास सांगितले होते व आता आमची हुशारी आम्हाला नडत होती. कारण अजून ४८ तास तरी गाव असे लागणारच नव्हते. डोंगरातली सर्व वाळू ओली व निसरडी झाली होती. त्यात भर म्हणून दगड आमची पाठ सोडायला तयार नव्हते. उंचीमुळे नंदिनीचे डोके दुखायला लागले. आता एक छोटेसे glacier पण चढून जायचे होते. नंदिनीला सर्वजण प्रोत्साहन देत होते. थोड्या थोड्या अंतरावर थांबत होतो. शेवटी २.३०च्या सुमारास 'Hamata Top' ला पोचलो. नंदिनीला पण जरा बरे वाटत होते. वाटेत तिला प्रचंड धांप लागत होती. श्वास फुटत होता. माझीहि मनातून स्थिती नंदिनी एवढीच वाईट होती. पण तोंडावर मात्र (खोटे का होईना) हसू होते. नाहीतर गोमूखच्या प्रवासात भोजवासाला एक रात्रभर आम्ही दोघेही रडत होतो तसे झाले असते.

'Hamata Top' वरुन 'हमता पास' आलो आणि गोकूळने सांगितले 'अंकलजी अब सब down आहे.' आम्ही उभयता खूश. पण पंधरा मिनिटात लक्षात आले. उतरण महाकठीण आहे. हाताची ढोपरं फुटत होती. Seat वर बसून उतरावे लागत होते. थोड्या वेळात आमच्यासाठी उभारलेले tent दिसत होते पण आम्हाला खाली पोचायला ६ वाजले. जेमतेम पोटात काहीतरी ढकलून झोपायचा प्रयत्न केला. फक्त एकच उपकार हिमालयाचा झाला तो म्हणजे आज पाऊस नव्हता. नाहीतर आमची हालत काय झाली असती देवच जाणे.

## आषाढातील पाऊस

**- डॉ. सौ. सीमा शाम** (पृ.४११), पुणे

घन गर्जले गर्जले
घरती धास्तावली
अंधारून नभ आले
भयभीत मने झाली
वाऱ्याच्या गोंगाटाने
रानं, शेते भांबावली
होवून ती ओलीचिंब
गुरं आडोशास आली
वेडावाकडा पाऊस
धुवाधार सुरू झाला
झोडपीले धरणीला
हाहा:कारच माजला
दुथडी नदी नाल्यांची
पाण्याने वाहू लागली
घराघरात संचारून
चाकोरी बाहेर गेली
धरतीचं झालं बघा
भलं मोठं रणांगण
पडझड सुरू झाली
झाडं पडली उन्मळून
आसमंत विस्कटून
मग वारा शांत झाला
ढग निघूनही गेले
खेळ सगळा संपला

**४ सप्टेंबर, बुधवार** - सकाळी नाश्ता केल्यावर सुमारे १० मिनिटे घोड्यावरून एक प्रचंड मोठा झरणा प्रत्येकाने पार केला. २।।-३ तास डोंगराची चढ उतार केल्यावर 'छतडू'च्या ओढ्याकडे पोचलो व सर्वजण खुशीत आले. कारण आता आजचे २ तास व पुढचे दोन दिवस चालायचे असले तरी सर्व प्लेन रस्त्याने चालायचे. उद्यापासून तर आम्हाला जीप वगैरे पण दिसणार होत्या.

चार दिवसात गाव नाही. ओढा पाहून tent लावणे. रात्रीच्या वेळी फक्त गद्दीची वर्दळ. परंतु कधीही एकाकी वाटले नाही अथवा आम्ही दोघंच असल्याची भीतीही वाटली नाही. 'छतडू' पोचल्यावर मस्त जेवण झाले. संध्याकाळी tent बाहेर उशीरापर्यंत गोकूळबरोबर गप्पा झाल्या व दुसऱ्या दिवशी 'छोटा दारा'ला पोचल्यावर आपण Dinner करणार असल्याचे नंदिनीने जाहीर केले.

**५ सप्टेंबर, गुरुवार** - नाश्ता केल्यावर जरा उशीरानेच म्हणजे ९।। च्या सुमारास चालायला सुरवात केली. सर्वत्र रखरखाट. झाडाचे नाव नाही. आम्ही 'लेह'च्या region मधून जात होतो. तशी लेह लडाखची ट्रीप गेल्या वर्षी झाली आहे. रस्ता सर्व प्लेन असल्यामुळे सुमारे १४ कि.मी. वर असलेल्या 'छोटा दारा' गावाजवळ या सर्वांच्या बराच पुढे पोचलो. नंतर तासभर झाला तरी गोकूळ नंदिनी अशा कोणाचाच पत्ता नाही. जरा वेळाने दोघेही आले. नंदिनीला Altitude Sickness त्रास सुरू झाला होता. आता तिथे आणखी थांबणे धोक्याचे होते. पूरणनी केलेला डाळ भात कसाबसा खाल्ला. गोकूळ रस्त्यावर बसून वाहनाची वाट पाहत होता. ४ च्या सुमारास एक जीप मनालीकडे जाणारी दिसली. ड्रायव्हरला परिस्थितीची कल्पना आली. त्यांनी आम्हा दोघांना मनालीला सोडायचे कबूल केले. रात्री अकराच्या दरम्यान मनालीत पोचलो. कमी उंचीवर आल्यामुळे औषधाविनाच आजार बरा झाला होता. गोकूळ जमेल त्या वाहनाने जमेल तेव्हा परत येणार होता.

एक दिवसाने आम्ही 'चंद्रताल'ला पोचलो असतो. पण झाले तेवढे साहस भरपूर झाले. मनालीला सुखरूप पोचलो यात सर्व आले. आतापर्यंत ७ ते ८ वेळच्या प्रवासात हिमालयाने आनंद तर दिलाच पण रक्षणही केले.

याआधी याहून जास्त उंचीवरील (१६५०० फूट) ओमपर्वत, लिपूपास पर्यंतचा २१ दिवसांचा ट्रेक आम्ही दोघांनी यशस्वीपणे पूर्ण केलेला होता. पण यावेळी मात्र त्याहून २ हजार फूट कमी उंचीवरील चंद्रतालचा ट्रेक पूर्ण होण्याचा योग नव्हता ही रुखरुख मात्र कायम राहिली.

★★★

# न जेवताच तृप्तीची ढेकर - समाधानाची

**- अच्युत महादेव चक्रदेव** (पृ.७३२), निवृत्त कारागृह अधीक्षक, पुणे

नाशिक मार्ग मध्यवर्ती कारागृहात वरिष्ठ तुरुंगाधिकारी म्हणून मी कामावर असताना अचानक एका संघटनेचे काही सत्याग्रही कारागृहात आणले. त्यादिवशी रविवार होता. खरं म्हणजे अशावेळी पोलीस खात्याकडून ह्याबाबत आगाऊ सूचना येतात. तशा त्यावेळी आलेल्या नव्हत्या. सर्व बंदीची जेवणे झालेली होती. सत्याग्रही बंदींची संख्या सुमारे तीनशे होती. त्यांची जेवणे झालेली नव्हती.

जेवणे आटोपून विश्रांती घेत असलेल्या स्वयंपाकगृहातील बंदीलाच मी सत्याग्रहींसाठी भाकऱ्या, भात, बेसन बनवायला सांगितले. आमची धावपळ सत्याग्रही पहात होते. थोड्याच वेळात गरम भाकऱ्या, भात, बेसन (पिठले) तयार झाले. या सर्वांना जेवायला बोलावणार तेवढ्यात सत्याग्रहींची काही नेतेमंडळी आली. त्यांनी प्रथम जेवण मागून घेतले. थोडीशी चव घेतल्यासारखी केली आणि हातातल्या भाकऱ्या भिरकावून दिल्या, बेसन थुंकून टाकले आणि बडबडायला सुरुवात केली. ''शीऽऽ हे काय अन्न आहे? आमच्या घरच्या जनावरांना सुद्धा यापेक्षा अधिक चांगले अन्न आम्ही देतो.'' इ. शेरे मारून इतर सत्याग्रहींनाही 'कोणी जेवू नका, आपण उपाशी राहू.' इत्यादी आदेश दिले.

यावर सर्व सत्याग्रही माझी प्रतिक्रिया पाहू लागले. मी तिथल्याच एका उंच पायरीवर उभा राहिलो व सर्वांना सांगितले की, तुमच्या समोर गरम गरम भाकऱ्या, बेसन, भात तयार आहे. मी स्वत: चव घेतली आहे. भाकऱ्या भिरकावण्यासारखं, थुंकून टाकण्यासारखं त्यात काहीच नाही. नेतेमंडळींनी तसं का केलं मला समजलं नाही. वास्तविक आपण 'अन्न हे परब्रह्म' मनतो, पूर्णब्रह्म मानतो आणि हे लक्षात घेऊनच बंदी येथे स्वयंपाक करतात. तुमच्या बंदीबांधवांनीच त्यांच्या विश्रांतीच्या वेळात ते तयार केले आहे. त्यांचा तुम्ही आदर करावा. मी तुम्हाला पुन्हा सर्व अन्न तयार करून देऊ शकेन. पण त्यात पुन्हा वेळ जाईल.

माझं हे आवाहन मी संपवलं तेवढ्यात २-३ सत्याग्रहींनी चव घेऊन पाहिली होती. भाकरी, बेसन खाल्ले होते. त्यांनी सगळ्यांना सांगितले ''अरे, जेवण झकास झाले आहे, चवदार आहे, छान आहे.'' हे त्यांनी सांगताच सत्याग्रहींनी भराभर रांगा लावल्या, जेवण घेतले, समाधानाच्या ढेकरा दिल्या आणि नेतेमंडळींनाही जेवण घ्यायला लावले. माझे त्यांनी आभार मानले व धन्यवाद दिले.

मला न जेवताही तृप्तीची, कर्तव्यपूर्तीची ढेकर आली. 'अन्न हे पूर्णब्रह्म' याची जाणीव ठेवून मी काम करत होतो त्याचे समाधान वाटले.

***

# माहेरवाशीण

**- सौ. विद्या सुनील चक्रदेव** (पृ.७३२), मुलुंड (पूर्व), मुंबई

स्त्री.....! जिला भारतीय संस्कृतीत माता, लक्ष्मी, धरित्री, आदिशक्ती, सुवासिनी अशा विविध नावांनी संबोधिले जाते. स्त्रीला जणू नदीचे प्रतिरूपच मानले जाते. कवींनीही स्त्रीला 'नदी'ची उपमा दिला आहे. ज्याप्रमाणे नदी अखंड वाहात राहून सागराला मिळते त्याप्रमाणे स्त्री देखील बाल्यावस्थेतला काळ संपवून तारुण्यात प्रवेश करून विवाहाच्या रूपाने सासरच्या कुळात विलीन होते. माहेरच्या ठिकाणचे मूळ उपटून सासरच्या ठिकाणी रुजवण्याचे काम ती लीलया पार पाडते. स्त्रीच्या ठिकाणी प्रचंड शक्ती वसत असल्यामुळे परक्या ठिकाणी - परक्या माणसांत संस्कृती जतन करण्यात, परंपरा कायम राखण्यात आपले सर्वस्व वेचते.

प्रत्येक विवाहित स्त्रीला माहेर हे जणू स्वर्गाप्रतच असते. मुलगी सासरी कितीही सुखात-ऐश्वर्यात नांदत असली तरीही चार दिवसांचे माहेरपण लाभणे ही तिच्यासाठी आनंददायक बाब असते. 'कन्याधन परक्याचे' हे तर खरेच, परंतु सासरी आपल्या मुलीला नीट वागवत आहेत की नाही हे मुलीच्या मातापित्याला जाणून घ्यायचे असते. त्यासाठी मुलगी माहेरपणाला येणे जरूरीचे असते. सासरच्या कोंडाळ्यातून स्त्रीच्या मनाला काही दिवस निवांतपणा मिळावा म्हणून भारतीय संस्कृतीत त्या त्या ऋतूनुसार सणांची योजना आखली आहे. चैत्रात चैत्रगौरी आणि आश्विन महिन्यात महालक्ष्मी, गौरीच्या रूपात स्त्री माहेरवाशीण म्हणून आपल्या घरी आलेली असते. अशी ही गौरीच्या रूपाने घरी आलेली

माहेरवाशीण फक्त चार दिवसांची पाहुणी असते. हे घरातल्या थोर मंडळींनी लक्षात ठेवूनच तिच्यासाठी गोडधोड जेवणाचा, पंचनैवेद्याचा घाट घातलेला असतो. माहेरवाशीणीच्या आगमनाने साऱ्या घराला नवचैतन्याचे उधाण येते. घरात सर्वत्र मंगलमय वातावरण पसरलेले असते. आता चार दिवस आपल्या हक्काचे आहेत म्हणून माहेरवाशीण घरभर मनसोक्त वावरते. सासरच्या घरची मनातील व्यथा ती आपली आई, आजी, बहीण, भावजय यांच्याशी बोलून हलके करण्याचा प्रयत्न करते. मग माहेरची माणसेही तिला मायेची-कर्तव्याची आश्वासकता समजावितात.

माहेरवाशीणीनेही खावे, प्यावे, मनसोक्त हुंदडावे. सर्व हौसमौज पुरवून घ्यावी. थोडक्यात यथासांग पाहुणचार झोडावा. यालाही कुणाचा आक्षेप नसतो. फक्त तिने हक्क सांगू नये; नि अधिकार सांगू नये. एवढेच!

उतू नये मातू नये घेतला वसा टाकू नये या व्रताची कर्तव्यभावनाही माहेरवाशीणीच्या मनाच्या एका कोपऱ्यात स्मरणात असते. आपणही कुणाची तरी पत्नी, स्नुषा, मुलाबाळांची माता आहोत या नात्यांची घट्ट वीण तिला कर्तव्याची आठवण करून देत असल्यामुळे, असे चार दिवस केव्हा जातात ते कळतही नाही.

मग माहेरवाशीणीला निरोप देण्याची वेळ जशी जवळ येते तसे सारेजण उदास मनाने अंतर्मुख होतात. मग साडी चोळी, खणा नारळाने तिची ओटी भरली की मग चार दिवसांच्या पाहुणचाराची तृप्तता मनात साठवून, आनंदपणा व प्रसन्नमुद्रता लेऊन पुन्हा चैत्रगौरीच्या रूपाने व नवरात्रीत महालक्ष्मीच्या रूपाने पुढच्या वर्षी नक्की येणार हे आश्वासन देऊनच माहेरवाशीण सर्वांचा निरोप घेते.....!

***

**हितगुज वर्गणीदारांचे पत्ते** (डिसेंबर २००४ पासून क्रमाक्रमाने हितगुज वर्गणीदारांचे पत्ते देण्यात आले. पुण्यातील सभासदांचे पत्ते या अंकात देण्यात आले आहेत. याबरोबरच सर्व वर्गणीदारांचे पत्ते आता देऊन झाले आहेत.)

२४४८८२४५/३०४०/७६०/६८६
किरण मधुसूदन खांबेटे
६९३/२ बुधवार पेठ, सौभाग्य बिल्डींग,
सकाळ ऑफिस समोर, **पुणे** ४११ ००२.

२४४५६०६३/४००५/४२६/४११
डॉ. शाम विष्णू मराठे
६१९ बुधवार पेठ, भिडे वाडा,
भाग्या मारुती जवळ, **पुणे** ४११ ०३०.

२४४८८९५५/२६३१/९७७/१२८
प्रमोद धुंडिराज मराठे
३०३ शनिवार पेठ, इंद्रधनुष्य अपार्टमेंट, फ्लॅट नं.८,
अक्षय नर्सिंग होमसमोर, **पुणे** ४११ ०३०.

२५२३१८२५/३३०१/९८३/७२२
गजानन त्र्यंबक चक्रदेव
४१९/६, सर्व्हे नं. १४, महालक्ष्मी निवास,
तपोधाम आश्रमाजवळ, **वारजे**, पुणे ४११ ०५२.

२४४८३४९२/PPP/८०२/७७२
श्रीमती शोभना वसंत चक्रदेव
३४, बुधवार पेठ, भिडे चेंबर्स, जोगेश्वरी सोसायटी,
**पुणे** ४११ ०३०.

२४४८३८२२/२८९५/४८७/३१८
सतिश माधव मराठे
५८३ नारायण पेठ, जलधारा अपार्टमेंट, श्री. ना. दा.
ठाकरसी कन्याशाळेजवळ, **पुणे** ४११ ०३०.

२४४७७३७९/३३२६/१००२/२७४
उदय गणेश मराठे
२०१ शनिवार पेठ, अक्षय नर्सिंग होम शेजारी,
**पुणे** ४११ ०३०.

५६२००६९८/२६८७/११३/२८०
सौ. नीलांबरी रमेश मराठे
१५२ शनिवार पेठ, अमृतेश्वर घाटाजवळ,
**पुणे** ४११ ०३०.

२४४७७५४७/XXX/९७२/५५२
सौ. निर्मला श्रीपाद मराठे
३१९ शनिवार पेठ, सिध्दांत अपार्टमेंट,
सुयोग मंगल कार्यालयामागे, **पुणे** ४११ ०३०.

२४४८३६६२/२८००/४२१/६७५
रमेश केशव खांबेटे
४९२ शनिवार पेठ, पोस्ट ऑफिसच्या वर,
**पुणे** ४११ ०३०.

२४४५६६३४/२७५४/३५३/४९०
मोहन मधुसुदन मराठे
३५३ रमणबाग सोसायटी, बी-३०६,
**शनिवार पेठ, पुणे** ४११ ०३०.

/२६६४/११४/२७९
दिनकर मुकुंद मराठे
५५० शनिवार, अमेय सोसायटी, कन्या शाळेजवळ,
**पुणे** ४११ ०३०.

२४४६३९१६/XXX/१००३/६२९
सौ. अलका दिवाकर विद्वांस
लक्ष्मी-केशव को. ऑप. हौ. सोसायटी, १३४७
सदाशिव पेठ, ३रा मजला, **पुणे** ४११ ०३०.

२७६७५२७१/३२५७/९३०/१३८
प्रसाद सदाशिव मराठे
देहूरोड विकासनगर मराठी शाळेजवळ, ता. हवेली,
**मु. पो. देहूरोड, जि. पुणे** ४१२ २०२.

२४३३७१८६/२१७६/५८१/२७१
लक्ष्मण गणेश मराठे
४९/७५८ लोकमान्य नगर, नवी पेठ,
**पुणे** ४११ ०३०.

२४३२०११९/ZZZ/९९२५/६९९
सौ. सुचेता दत्तात्रय खांबेटे
११/ब/६१३ लोकमान्य नगर,
**पुणे** ४११ ०३०.

२४३३३७९९/२९८४/६६०/५१२
अनुरुप भिकाजी मराठे
सी ४/४८/४९ लक्ष्मी पार्क सोसायटी,
नवी पेठ, **पुणे** ४११ ०३०.

२४३३१७८६/२१६१/१४६/९८
मकरंद श्रीधर मराठे
'कल्पद्रुम' ६३५/३ साने गुरुजी नगर,
निलायम टॉकीज समोर, **पुणे** ४११ ०३०.

२४३३१६७१/२०४५/३५४/३८४
रंगनाथ यशवंत मराठे
३/३४ लोकमान्य नगर, नवी पेठ,
**पुणे** ४११ ०३०.

२४४८०९६८/XXX/८०४/पृ.?
सौ. गौरी शेखर देव
२६ शुक्रवार पेठ, भाऊ महाराज बोळ,
**पुणे** ४११ ००२.

२४४८१२०८/२३७३/१०८/७३२
अच्युत महादेव चक्रदेव
२६ शुक्रवार पेठ, भाऊ महाराज बोळ,
**पुणे** ४११ ००२.

२४४७३४७५/२६२६/१०७/१५६
अजित विजय मराठे
१४५७ शुक्रवार पेठ, रबडे वाडा,
भाऊ महाराज बोळ, **पुणे** ४११ ००२.

२४४९२३६८/२९८७/७५४/५१३
श्रीमती शुभदा शंकर मराठे
१४१/ए, शुक्रवार पेठ, शिंदे आळी,
**पुणे** ४११ ००२.

/२६२७/११२/२४७
रवींद्र लक्ष्मण मराठे
११९४ शुक्रवार पेठ, सुभाषनगर, गल्ली नं. ३,
**पुणे** ४११ ००२.

विजय अनंत मराठे
१४५७ शुक्रवार पेठ, भाऊ महाराज बोळ,
**पुणे** ४११ ००२.

२४४८४९१९/२४८७/३१२/३६६
सुधाकर राजाराम मराठे
१३८० शुक्रवार पेठ, केळकर संग्रहालयाजवळ,
**पुणे** ४११ ००२.

२४४७४१७०/२३७०/१०९/११८
चंद्रशेखर शंकर मराठे
१२६४ शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ६,
**पुणे** ४११ ००२.

२४४७९२७३/२६६३/१११/२९७
सौ. अनुराधा मुकुंद मराठे
१२७९ शुक्रवार पेठ, सुभाषनगर गल्ली क्र. ६,
**पुणे** ४११ ००२.

२४४९४९४९/३०२५/७३५/४१
विष्णू रामचंद्र मराठे
९६२ बुधवार पेठ, विजयानंद टॉकीजजवळ,
खंडोबा मंदिर, **पुणे** ४११ ००२.

२४४७४६०१/२२५५/४४८/१०८
काशिनाथ दत्तात्रय मराठे
१३७६ शुक्रवार पेठ, नातूबाग,
केळकर संग्रहालयाजवळ, **पुणे** ४११ ००२.

२४४५२९९०/३२५४/९२६/१२७
केशव कृष्ण मराठे
१४१० शुक्रवार पेठ, रतन सायकल मार्ट समोर,
**पुणे** ४११ ००२.

२४४५५४५४/???/९५२/७३२
सौ. देवयानी सुहास दीक्षित
२८१ नारायण पेठ, दीक्षित गॅरेज, पाराजवळ,
**पुणे** ४११ ०३०.

२४४५३७९०/XXX/९७९/६७६
सौ. उर्मिला अरविंद खरे
२०२ शनिवार पेठ, अक्षय नर्सिंग होमच्या वर,
वीराच्या मारुतीजवळ, **पुणे** ४११ ०३०.

श्री. प्रफुल्ल लक्ष्मण चक्रदेव
१६३१ ब, सदाशिव पेठ,
**पुणे** ४११ ०३०.

२४४८६२८१/२१३८/८३८/२७९
सुरेश भालचंद्र मराठे
११२४ सदाशिव पेठ, निंबाळकर तालीम चौक,
शलाका हौसिंग सोसायटी, **पुणे** ४११ ०३०.

२४४८७५९७/३३६३/१०३४/१६१
वसंत श्रीराम मराठे
बी-४, उमानाथ सोसायटी, १०४५ सदाशिव पेठ,
निंबाळकर तालीम चौक, **पुणे** ४११ ०३०.

/२६२०/९९/२३९
[illegible] मराठे
[illegible] सदाशिव पेठ, खुन्या मुरलीधर मंदिरासमोर,
[illegible] अपार्टमेंट, **पुणे** ४११ ०३०.

२४४३३२१८/२७५५/३५६/६६०
